# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

**बी.ए. तृतीय वर्ष (सत्र - VI)**

**प्रकल्प अहवाल**

**सत्र - २०२१ -२२**

**"कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन"**

**संशोधक**

कु. ऋतुजा दिलीप कातोरे

बी.ए. तृतीय वर्ष

**मार्गदर्शक**

डॉ. रवींद्र बापूराव शेंडे

अर्थशास्त्र प्रमुख

लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की.
कु. मेघना दिलीप कातोरे यांनी "कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन" अर्थशास्त्रीय अध्ययन या विषयावरील शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनासाठी पूर्ण केला आहे. हे संशोधन कार्य त्यांनी स्वतः केले असून विद्यापीठाच्या आवश्यक असलेल्या सर्व अटींची पूर्तता केली आहे.

मार्गदर्शक
~~डॉ. रवी~~
डॉ. रविंद्र बापूराव शेंडे

स्थळ - वरोरा
दिनांक - २३/५/२०२२

## प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संशोधन प्रबंध करिता सादर केलेल्या विषय "कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन" या विषयावरिल शोधप्रबंध मी स्वतः तयार केला असुन यापुर्वी या विद्यापीठाला अथवा इतर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला आहे.

संशोधक
कु. ऋतुजा दिलीप कातोरे

स्थळ - तिरोडा

दिनांक - २२/५/२०२२

# अनुक्रमणिका

प्रस्तावना

संशोधन पद्धती

उद्दीष्ट्ये

विषयाचे नाव व माहिती

तथ्य आणि तथ्यांचे विश्लेषण

निष्कर्ष

गृहीते

उपाययोजना

विषयाचे अध्ययन

संदर्भ ग्रंथ

पुस्तकांचे नाव

## प्रस्तावना-

सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या बाजारपेठांचे म्हणजेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्य कोणत्या पद्धतीने सुरू आहे. त्यापासून शेतकरी वर्गाला लाभ मिळत आहे किंवा नाही. शेतकऱ्यांकरिता जिल्ह्यातील बाजार समितींनी कोणकोणत्या सोई केलेल्या आहेत तसेच कोणकोणत्या सोई व सुविधांचा शेतकऱ्यांना लाभ होत आहे. जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्नाची कोणकोणती साधने आहेत. ती साधने त्यांच्या दृष्टीने परिपूर्ण आहेत काय कि कृषी उत्पन्न बाजार समितींना इतर ठिकाणाहून कर्ज घ्यावे लागते की सरकार कडून अनुदान मिळत होते. त्याचप्रमाणे बाजार समित्या शेतकऱ्यांच्या सोयीकरिता कोणकोणत्या बाबींवर खर्च करतात. बाजारपेठांमध्ये कोणकोणत्या अनिष्ट प्रथा आहेत? कारण ग्राहक व विक्रेते यांचे हित सुरक्षित ठेवून वस्तूंच्या खरेदी विक्रीचे व्यवहार सुरळीतपणे पार पाडण्याकरिता बाजार पेठांचे नियंत्रण करण्याची आवश्यकता आता सर्वमान्य झाली आहे. शेतमालाच्या विचार केल्यास शेतमालाची विक्री करणारा शेतकरी साधनांच्या दृष्टीने अत्यंत दारिद्र्य असंघटित व अज्ञानी असतो तर दुसरा पक्ष म्हणजे व्यापारी साधनांच्या दृष्टीने संपन्न संघटित व जागरूक असतो. ह्या कारणांमुळे शेतकऱ्यांचे विविध प्रकार शोषण होणे अत्यंत नैसर्गिक असते. बाजारपेठांचे नियंत्रण करण्याची शास्त्रीय पद्धती अस्तित्वात नसल्यास शेतकऱ्यांना वरील अडचणींचा सामना करावा लागतो.

१) शेतकऱ्यांने विकलेल्या मालाच्या किंमतीमधून विविध खर्चावर कपात करणे.

२) शेतकऱ्यांच्या मुळीच संबंध नाही अशा कारण्यांसाठी अनुदान वसुल करणे.

३) शेतकऱ्यांने अग्रीम म्हणून व उचललेल्या रकमेवर भरमसाट दराने व्याज आकारणे.

४) शेतकऱ्यांचे विक्रीसाठी आणलेल्या मालाची विक्री गुप्तरितीने किंवा सांकेतिक पद्धतीने करणे.

५) शेतकऱ्यांने मालाची विक्री केल्यानंतर त्याला ताबडतोब पैसे शोधून न देणे.

६) शेतकऱ्यांकडून अवाजवी दराने दलाली वसुल करणे.

७) शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या मालातून मोठ्या प्रमाणात अडत्या / दलाल / व्यापाऱ्याने नमुना म्हणून मालाची उचल करणे.

८) बाजारपेठेत जाणिवपूर्वक गडबड करून शेतमालाची भाव खाली आणण्याकरिता जाणिवपूर्वक प्रयत्न करणे.

परित सर्व अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांची समित्यांची निर्मिती यांचे उच्चाटन किती प्रमाणात झाले आहे. याबाबत केलेले कार्य किपत

यशस्वी झाले किंवा त्यात सुधारणा करण्याची गरज आहे काय? त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव नसल्यास बाजार समितीच्या आवारमध्ये आधारभूतकिंमतीच्या सोई आहे काय? व असल्यास त्या नाममात्र कागदावरच शेतकऱ्यांच्या मालसाठवणूकासाठी दिल्या जातात काय तसेच बाजारसमितीचे प्रबंधन योग्य रितीने होत आहे आहे किंवा नाही? त्याचप्रमाणे आर्थिक बाबींच्या संबंधीच उत्पन्न व खर्चाच्या योग्य पणे हिशोब ठेवला जातो किंवा नाही व जिल्ह्यातील बाजार समित्यांची आर्थिक स्थिती काय प्रकारची आहे. त्यापासून शेतकऱ्यांना कोणकोणते फायदे प्राप्त होतात. त्याच प्रमाणे शेतकऱ्यांकरिता बाजार समितीला मिळणाऱ्या नफ्यातून कोणकोणत्या सोई उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ह्या सर्व प्रश्नांची उत्तर मिळविण्याकरिता त्या विषयी विश्लेषण करण्याकरिता कृषी उत्पन्न समित्यांच्या अभ्यासाची आवश्यकता आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये कृषी उत्पादनाच्या नियमित बाजारपेठसंबंधी वस्तुनिहाय अधिनियम. महाराष्ट्रातील उत्पन्ननिहाय कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वर्गीकरण, महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वर्गीकरणानुसार वर्गीकरण, जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे गटानुसार वर्गीकरण, जिल्ह्यातील उत्पन्न निहाय कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे प्रमाण इ.चे विवेचन केले आहे.

## संशोधन पद्धती

या प्रकरणात प्रामुख्याने बाजार, विपणन, कृषी विपणन, कृषी विपणनाचे कार्य, घटक, उद्दिष्ट्ये, महत्त्व या बरोबरच शास्त्रीय व आदर्श कृषी विपणनाचे लक्षणे ई बाबीवर प्रकाश टाकला आहे. कृषी विपणनाची प्रचलित पद्धती, भारतातील कृषी विपणन प्रणाली याचाही अभ्यास केला आहे. कृषी विपणनाची महाराष्ट्रातील स्थिती आणि या संदर्भातील आजपर्यंत झालेल्या उपाययोजना यांचाही अभ्यास केला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील समग्र कृषी विपणन प्रणालीवर हा प्रकाश टाकला आहे.

आर्थिक प्रणाली, व्यवस्था पद्धती कोणतीही असो. त्या अर्थव्यवस्थेतील अधिसत्ता प्रत्येक क्षेत्राचे उत्पादन, उत्पादकता, सादरीकरण व प्रगती साध्य करण्यासाठी सामान्यपणे प्रयत्नशील असते. याद्वारे त्या अधिसत्तेला राष्ट्रातील नागरिकांचे कल्याण व प्रगती, त्यांचे पालन पोषण साध्य करावयाचे असते. तसेच अंतर्गत प्रगतीबरोबरच राष्ट्राचे संरक्षण व आर्थिक सबलीकरण करणे महत्त्वाचे उद्दिष्ट्य असते. अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्राचा समतोल विकास घडून आणणे हे त्या त्या राष्ट्रीय धोरणाचे उद्दिष्ट्ये असते. या दृष्टीने प्रत्येक राष्ट्र आपले आर्थिक व राजकीय बळ वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो. या उद्दिष्ट्यांच्या प्राप्तीसाठी उपलब्ध साधनसंपत्तीचा कार्यक्षम विवेकशील व प्राधान्य क्रमानुसार वितरण व पुनर्वितरण करत असतो. अर्थव्यवस्थेतील या उद्दिष्ट प्राप्ती साठी व अर्थव्यवस्थेचे कुशल व्यवस्थापन

देण्यासाठी अर्थव्यवस्थेत प्रभावी व्यवस्थापन कार्य करत असते. उपरोक्तांच्या मते सर्व अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात धोरणात्मक साधनांच्या माध्यमातून योग्य तो हस्तक्षेप करणे आवश्यक आहे.

विपणन ही एक आर्थिक व सामाजिक क्रिया आहे. उत्पादने व सेवा यांची स्थळ, काळ, ज्ञान, स्वामित्व, उपयोगिता वाढविण्यास व मूल्य वर्धन करण्यास विपणन क्रिया अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडते. प्रभावी, शास्त्रीय व आदर्श विपणन व्यवस्थेमुळे बाजारपेठेचा विकास व विस्तार वाढतो. यामुळे अधिक उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास चालना मिळते. भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था असून भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ५४.८६ प्रतिशत लोकसंख्या ही कृषीवर अवलंबून आहे. कृषी हा सर्व सजीवांचा आधार आणि अंतिम आश्रयस्थान आहे. त्यामुळे शेती क्षेत्राकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज आहे. देशातील शेती व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व देशातील द्वितीय व तृतीय क्षेत्राचा विकास करण्यासाठी, तसेच वाढत्या लोकसंख्येला अन्न धान्याचा पुरवठा करण्यासाठी शेती क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. या करिता भारत सरकारने शेती क्षेत्र व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ब्रिटिश काळापासून प्रयत्न सुरू केले. देशातील शेतमालाच्या विपणन व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याची नियमित बाजारपेठेची स्थापना ही एक महत्त्वपूर्ण सुधारणा आहे. देशातील उत्पादित कृषीमालाला योग्य भाव

मिळण्यासाठी कृषीमालाची बाजारपेठेत योग्य मतवारी होण्यासाठी. तसेच शेतमालाची बाजारपेठेत होणारी नासधूस थांबवण्यासाठी आहे. फळे, मत्स्य यांच्याकडून होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी नियंत्रित कार्यक्षम बाजारपेठेची आवश्यकता अजूनही भासत आहे. दोषपूर्ण वितरण व्यवस्थेमुळे भारतीय शेतकऱ्यांवर आपला कृषिमाल अयोग्य बाजारपेठेत अयोग्य वेळी व अयोग्य किंमतीस विकण्याचा प्रसंग येतो. त्यामुळे अहोरात्र परिश्रम करूनही शेतकऱ्यांना आपल्या शेतीमध्ये उत्पादन वाढविण्याची मर्यादा पराकाष्ठा केली तरी त्यांच्या उत्पादनात आणि मोबदल्यात फारशी वाढ होत नाही. कृषिमालाच्या वितरणाच्या समस्या जो पर्यंत संपत नाहीत. तोपर्यंत देशातील पिडीत व गरीब शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार नाही, त्यांची आर्थिक स्थिती सुधारणार नाही, देशातील गरिबी, दारिद्र्य बेकारी, उपासमार, अन्न कमतरता तसेच द्वितीय क्षेत्राला लागणाऱ्या कच्चामालाची कमतरता इ. समस्या सोडविण्यासाठी नियंत्रित कृषी उत्पन्न बाजार समित्यांतील दोषपूर्ण व्यवस्था दूर करण्यासाठी संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

## संशोधनाचे महत्त्व.

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या क्षेत्राच्या सबलीकरणाचे समतोल विकास शक्य आहे. या क्षेत्राच्या सबलीकरणासाठी कृषी समुदायाला, इतर उपयोगी व्यवसायाप्रमाणे योग्य (खर्च-उत्पन्न-आधारित) परतावा मिळणे आवश्यक आहे.

विपणन ही महत्त्वाची आर्थिक सुविधा असल्याने कृषी उत्पादनाच्या ~~परत~~ परतावा निर्धारित करण्याच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचा निर्णायक घटक आहे. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे.

खुल्या आर्थिक धोरणाचा आणि मुक्त बाजार पद्धतीचा अधिका अधिक अवलंब होत असतांना पारंपारिक विपणन प्रणाली, अधिक अधिक स्पर्धात्मक, पारदर्शी व कार्यक्षम होणे गरजेचे आहे. ही पद्धती कृषी समुदायाच्या शोषणाचे साधन न बनता त्यांच्या सर्वांगीण विकासाचे साधन बनले पाहिजे. या समस्येच्या विवेचन करण्या संदर्भात प्रस्तुत संशोधन उपयुक्त आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील निवडक कृषी उत्पन्न बाजार समितीचा अभ्यास केल्यामुळे शेतकरी विक्रेते यांच्या सवलती सुविधा, गैरव्यवहार, इ. वर नियंत्रण घालणे शक्य होते. प्रस्तुत अभ्यासामुळे अडते व व्यापारी यांच्यातील सवलती सुविधा, गैरव्यवहार शेतकऱ्यांना माहिती होणे शक्य होईल व त्यावर नियंत्रण घालणे शक्य होते.

उद्दिष्ट्ये :

1) चंद्रपूर जिल्ह्यातील बाजार समित्यांच्या विकासाचे अध्ययन करणे

2) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विकास कार्याचे मुल्यमापन करणे

विषयाचे नाव- कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन

माहिती:

कृषी व संलग्न कार्य हे क्षेत्र नेहमीच अर्थव्यवस्थेच्या व सामाजिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी राहिले आहे. राज्यातील बहुतांशी लोकसंख्या उपजिविकेसाठी या क्षेत्रावर अवलंबून आहे. हवामान बदल आणि उपजाऊ जमिनीचा कमी होत जाणारा कस यामुळे या क्षेत्राला नेहमीच आव्हानांना सामोरे जावे लागते. अनियमित पाऊस, साधन सामुग्रीचा वाढता खर्च, बाजारभावातील अनिश्चितता, हवामानातील बदल इत्यादी बाबी या क्षेत्रासाठी महत्त्वाच्या आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने राज्यामध्ये कृषी विभागाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर कृषी क्षेत्रात जसजशी प्रगती होत गेली तस तशी कृषी विभागामध्ये रचनात्मक स्थित्यंतरे होत गेली. सुधारित कृषी तंत्रज्ञान प्रसारासाठी कृषी विस्तार व प्रशिक्षण विभाग, नैसर्गिक साधन सामुग्रीच्या व्यवस्थापनासाठी मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन विभाग, शेतकऱ्यांना दर्जेदार निविष्ठांची उपलब्धता करून देण्यासाठी निविष्ठा व गुणनियंत्रण विभाग, शेतमालाच्या प्रक्रियेत प्रोत्साहनासाठी कृषी प्रक्रिया विभाग व शेतमाला च्या निर्यातीस प्रोत्साहनासाठी कृषी प्रक्रिया व निर्यातक्षम शेती विभाग तसेच कृषीविषयक सांख्यिकी माहितीचे संकलन व संस्करण करण्यासाठी सांख्यिकी विभाग सुरु करण्यात आला. फलोत्पादनामध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणण्याच्या

दृष्टीने राष्ट्रीय फलोत्पादन अभियान सुरू केले. शेतकऱ्यांच्या कृषी व्यापार व मूल्यवृद्धी साठी प्रकल्पांना मार्गदर्शन व वित्तीय व्यवस्थापनाचा सल्ला देण्याच्या दृष्टीने लहान शेतकऱ्यांचा कृषी व्यापारसंघ स्थापना करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या शेतीवर घेण्यात येणाऱ्या विविध पिकांचे उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या सुधारित तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. त्यामध्ये प्रामुख्याने भौगोलिक परिस्थितीनुसार पीक नियोजन, सुधारित वाणांचा वापर, जमिनीचे आरोग्य टिकून राहण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना, जमिनीच्या प्रतीनुसार खतांचा संतुलित वापर, जैविक उपाययोजना द्वारे किड व रोगांचे नियंत्रण, ठिबक व तुषार सिंचन पद्धतींचा अवलंब, बीजप्रक्रिया इत्यादी बाबींवर भर देण्यात येत आहे. शेतकऱ्यांची बियाण्याची गरज स्थानिक पातळीवरच भागविण्याच्या दृष्टीने बिजोत्पादन कार्यक्रम, सुधारित तंत्रज्ञान प्रसारासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, शेतकऱ्यांच्या शेतीशाळा राबविण्यावर भर देण्यात येत आहे. राज्यातील शेतकऱ्यांना जमिनीच्या अन्नद्रव्याची माहिती करून देण्यासाठी व त्यानुसार खतांचा संतुलित वापर होण्यासाठी जमिनीचे आरोग्य पत्रिका वितरणाचा महत्त्वकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याच बरोबर राज्यातील शेतकऱ्यांना जैविक खते व जैविक कीटकनाशके उपलब्ध करून देण्यासाठी जैविक प्रयोगशाळांची स्थापना करण्यात आली आहे. शेती व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी यांत्रिकीकरणाचा वापर वाढविण्यात येत आहे. तृणधान्ये, कडधान्ये, गळीतधान्ये, ऊस व कापूस पिकांचे अन्न सुरक्षा अभियान राबविले जाते.

# तथ्य आणि तथ्याचा विश्लेषण

तथ्यांचे प्रकार पुढील प्रमाणे

1) प्राथमिक तथ्य
2) दुय्यम तथ्य

1) **प्राथमिक तथ्य** -

प्रस्तुत प्रकरणा मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितिच्या कार्यांणाकुरी योजनांच्या व समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी लाभार्थी शेतकरी, अडते किंवा व्यापारी आणि बाजार समितीतील अधिकारी, कर्मचारी व संचालक मंडळातील सदस्यांचे मत विचारात घेतले आहे. ही माहिती मुख्य: प्राथमिक सामुग्रीवर आधारित आहे. ही माहिती संकलित करण्यासाठी काही समित्यांची निवड करण्यात आलेली आहे.

निवडक कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या प्रत्येक बाजार समितीतून प्रत्येकी १० गावांची निवड केली आहे. प्रत्येक गावातुन ४ शेतकरी लाभार्थ्यांची निवड केलेली आहे. म्हणजेच त्या प्रत्येक बाजार समितीतून ४० याप्रमाणे एकूण ५ निवडक कृषी उत्पन्न बाजार समितीतून २०० लाभार्थी शेतकऱ्यांची निवड केली असून त्यांची माहिती प्रश्नावली द्वारे संकलित केलेली आहे. तसेच संशोधनामध्ये तक्त्यात दाखवल्या प्रमाणे निवडक कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या प्रत्येक बाजार समितीतून प्रत्येकी १० गावप्रमाणे एकूण ५० गावांची. एकूण शेतकरी संख्या ३४१३ आहे. त्यापैकी संशोधनामध्ये २०० लाभार्थी शेतकरी नमुना म्हणून घेतलेली नमुन्याचा आकार ५.८६ टक्के इतका असलेला दिसून येतो.

निवडक कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या प्रत्येक बाजार समितीतून प्रत्येकी ४० अडते किंवा व्यापारी यांची निवड करण्यात आलेली आहे. या अडते किंवा व्यापाऱ्यांकडून प्रश्नावली द्वारे माहिती संकलित केली आहे. प्रत्येक बाजार समितीतून ४० याप्रमाणे पाच निवडक कृषी उत्पन्न बाजार समितीतून २०० [illegible] शेतकरी व २०० अडते किंवा व्यापाऱ्यांची माहिती मिळविण्यात आलेली आहे. तसेच संशोधना मध्ये लक्षात घेतल्याप्रमाणे निवडक कृषी उत्पन्न बाजार समित्या मध्ये एकूण व्यापाऱ्यांची संख्या १३६० इतकी घेतलेली आहे. त्यापैकी संशोधनामध्ये २०० अडते व व्यापारी नमुना म्हणून घेतलेले असून नमुन्याचा आकार १४.७१ टक्के इतका असलेला दिसून येते.

अभ्यास कालावधीत प्रत्यक्ष निरीक्षणाच्या सहाय्याने माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. अभ्यासासाठी निवडक कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निवड ही गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धती नुसार करण्यात आली आहे. तसेच गावांची व शेतकरी वर्गाची निवड ही गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील सोयीस्कर नमुना निवड पद्धतीनुसार करण्यात आलेली आहे. तर व्यापारी किंवा अडत्यांची निवड ही गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड पद्धती नुसार करण्यात आली आहे.

## दुय्यम तथ्य.

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम तथ्य स्रोत म्हणून जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, कृषी विद्यापीठांचे अहवाल, कृषी मंत्रालयाचे अहवाल, संबंधित शासकीय अधिनियम, दैनिक हिंदू दैनिकांचे विशेष अहवाल, NIAM हे अहवाल, जनगणना अहवाल इ. म्हणून स्रोतांचा वापर केला आहे.

उत्पन्न बाजार समितीचा अभ्यास या संशोधनात केला आहे कारण या समितीची व्याप्ती मोठी असून या सर्व समित्या पूर्वीपासून कार्यरत आहेत. त्यांच्या विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वार्षिक अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन यांचे विविध अंक. जिल्हा सांख्यिकी विभाग यांचे वार्षिक अहवाल, महाराष्ट्र राज्यांचे वार्षिक पाहणी अहवाल, कृषी विभाग, जिल्हा परिषद यांचे वार्षिक अहवाल, विविध प्रकरणे, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे इ. मधून माहिती संकलित केली आहे.

निष्कर्ष -

1) राज्यातील नैसर्गिक साधन संपत्तीचा कार्यक्षम वापर करून उत्पादन वाढीचा दर वाढविणे.

2) राज्यातील शेतकऱ्यांना स्वावलंबी करणे.

3) राज्यातील मर्यादित जलसंपत्तीचा कार्यक्षम वापर करणे.

4) निविष्ठांचे उत्पादन व वेळेवर वितरण व्यवस्था उपलब्ध करणे.

5) पिकांकरिता पुरेसा व वेळेवर पतपुरवठा उपलब्ध करणे.

6) नैसर्गिक व सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे.

7) पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यक्रमाची तसेच कोरडवाहू कृषी संशोधन कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे.

8) राज्यातील पडिक जमिनीची धूप थांबवून ती फळबाग, वनशेती व कुरण विकासाखाली आणून रोजगार निर्मिती करणे.

9) पीक विमा योजना व्यापक प्रमाणात राबविणे.

10) कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे.

## आवश्यकता -

महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजाराच्या इतिहासाची सुरुवात हैद्राबाद संस्थानिकांच्या नियंत्रणात असलेल्या "हैद्राबाद" ॲग्रीकल्चरल मार्केट ॲक्ट १९३० साली करंजी येथे स्थापना झाल्यापासून झाली. परंतु जरी महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजाराची स्थापना ब्रिटिशांच्या कारकिर्दीत १९ व्या शतकात सुरू झाली असली तरी फक्त ती व्यावसायिक दृष्टीने आवश्यक असलेल्या कृषी धान्यापर्यंत मर्यादित होती. व्यावसायिकतेच्या दृष्टीने ब्रिटिशांनी मँचेस्टर येथील गिरण्यांना नेहमीत व रास्त दराने कापसाचा पुरवठा व्हावा या उद्देशाने इंग्रजांनी पाऊले उचलण्यास सुरुवात केली. त्यामुळे सर्व प्रथम ब्रिटिशांनी हिंगणघाट येथे (पूर्वीचा वर्धा जिल्ह्यातील तालुका) १८८६ पासून उत्तम दर्जाचा कापूस विविध ठिकाणाहून कापड गिरण्यांना पाठविला जाऊ लागला. त्यावेळेस फक्त कापूस बाजाराचा नेहमीत केला गेला होता. ह्यानंतर १८९७ साली कापूस व धान्य नियमित करण्यासाठी 'कॉटन ॲण्ड ग्रेन मार्केट', हा कायदा कृषी मालासाठी रॉयल कमिशनच्या सूचनांनुसार नियमित कायद्यात आला. या कायद्याचा उद्देश.

1) कृषी मालाच्या किंमतीवर लक्ष ठेवणे.

2) कृषी मालाच्या वजन मापतील होणारे अपहार काय किंवा शेतकऱ्यांची होणारी फसवणूक यावर नियंत्रण ठेवणे हा हेतू.

महाराष्ट्रातील त्या वेळेसच्या बॉम्बे
स्टेटच्या बॉम्बे रेसिडेन्सी गव्हर्नमेंटने प्रथम वेट्स
ॲण्ड मेझर्स ॲक्ट - १९३२ ची स्थापना केली.
या कायद्यामुळे प्रत्येक वेळी वजन माप तपासण्याचे
काम केले गेले. या संबंधाची जबाबदारी बॉम्बे
सरकारच्या इन्स्पेक्टर ऑफ वेट ॲण्ड मेझर या
अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आली होती. त्यानंतर रॉयल
कमिशनने असे सूचविले की बॉम्बे कायदा हा
बेरार कायद्या पेक्षा महत्त्वाचा व आदर्श आहे.

१९३४ मध्ये मध्यप्रांत व वऱ्हाडच्या
शेती उत्पन्नाच्या बाजाराबाबद कायदा करण्यात आला
१९३५ मध्ये एक मॉडेल बिल स्टेट्स ॲग्रिकल्चरल
मार्केटिंग डिपार्टमेंटने तयार केले आणि मुंबई
सरकारने १९३९ मध्ये 'द बॉम्बे ॲग्रिकल्चरल
प्रोड्यूस मार्केटिंग ॲक्ट' संमत केला. तसेच १९३९
मध्येच 'मध्यप्रांत' व वऱ्हाड कापूस बाजार अधिनियम
मंजूर करण्यात आला. त्याच प्रमाणे १९३९ मध्येच
फसलीचा हैद्राबाद शेती उत्पन्न बाबत अधिनियम
मंजूर करण्यात आला. त्या पाठोपाठ पंजाब, म्हैसूर या
राज्यांनी सुद्धा वरील कायदा मंजूर केला.

म्हणजेच 'बऱ्याच' अर्थाने ॲग्रिकल्चरल
प्रोड्यूस मार्केट ॲक्ट च्या स्थापने नंतर रॉयल
कमिशनच्या खालील विचाराना पुढे सुरू केले
१९३९ च्या 'द बॉम्बे' ॲग्रिकल्चरल मार्केट ॲक्ट
नुसार नियमन करण्यात आले

1) बाजारभावांचे मार्गदर्शन

2) खरेदीदार, दलाल, व्यापारी यांच्यातील वाद मिटविणे

3) उघड लिलाव करणे.

4) मार्केटयार्ड स्थापन करणे सरकारच्या पूर्व निर्णयासाठी सदर मार्केट यार्ड देणे.

5) रोजच्या रोज बाजारभावाबद्दल शेतकऱ्यांना त्वरित माहिती देणे.

द बॉम्बे अॅग्रिकल्चरल प्रोड्यूस अॅक्ट १९३९ ने नियमित बाजाराचे प्रशासन योग्य पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला गेला. या कायद्याने कोऑपरेटिव्ह सोसायटीज आणि द डायरेक्टर ऑफ अॅग्रिकल्चर मार्केटिंग सहा रजिस्ट्रार हा अधिकारी नियुक्त केला गेला. हा अधिकारी बाजार समित्या व शासन यांच्यात दुवा निर्माण करीत असे. बाजार समिती मध्ये सदस्यांची नियुक्ती करणे. बाजार समिती सहित आवश्यक ते प्रस्ताव सादर करणे इत्यादी कामाची जबाबदारी या अधिकाऱ्यांची होती. म्हणजेच या अधिकाऱ्याला दोन प्रकारची कार्ये पार पाडावी लागत असत. एक म्हणजे बाजार समितीचा मुख्य अधिकारी म्हणून प्रशासकीय काम पाहणे आणि दुसरे म्हणजे शासनाच्या सल्लागार म्हणून.

मुख्य बाजार अधिकारी हा केंद्र किंवा राज्य शासनाकडून प्रमाणित अधिकारी म्हणून नियुक्त केला जात असे. जिल्हा अधिकारी हा बाजार समितीचे व्यवहार पाहत असे. त्याच प्रमाणे बाजार समितीच्या निवडणुका होत असे. अनुज्ञप्ती देण्याचे व नियंत्रण ठेवण्याचे काम देखील करीत आहे.

१९३९ च्या कायद्या नुसार महाराष्ट्र व सौराष्ट्र कोऑपरेटिव्ह सोसायटीच्या रजिस्ट्रार आणि ॲग्रीकल्चरल मार्केटच्या डायरेक्टर काम पाहत असत संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापने पर्यंत वरील अधिकारी काम पाहत होते. जिल्हा उपायुक्त व सेंट्रल प्रोव्हिन्सच्या ॲक्टनुसार विदर्भातील बाजार समितीचा व्यवहार पाहत होता. मराठवाड्यामध्ये बोर्ड व गव्हर्नमेंटचा रजिस्ट्रार आणि डायरेक्टर यांना निवडणुका घेण्याचे अधिकार दिले होते. आणि हैद्राबाद ॲग्रीकल्चरल मार्केटच्या नियमानुसार प्रशासनाचे काम सोपविले. पुढे नंतर हे अधिकार मुख्य बाजार अधिकारी आणि डेप्युटी रजिस्ट्रार यांना देण्यात आले.

| बाजार समित्यांचा विकास | अवलोकित संख्या | टक्केवारी | अपेक्षित संख्या | टक्केवारी | अंतर |
|---|---|---|---|---|---|
| होय | ४२ | १४.० | १०० | ३३.३ | -५८ |
| नाही | १९८ | ६६.० | १०० | ३३.३ | ९८ |
| माहिती नाही | ६० | २०.० | १०० | ३३.२ | -४० |
| एकूण | ३०० | १०० | ३०० | १०० | |
| काई वर्ग मूल्य १४५.६० | | स्वातंत्र्यांश २ | | सार्थकता स्तर <०.०५ | |

# संदर्भ ग्रंथ


* डॉ. भागवत, प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती.

* श्री भांडारकर. पु.ल. सामाजिक संशोधन पद्धती, दत्त प्रकाशन. पुणे १९७६.

* प्रा. प्रो घाटोळे रा.ना. सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे. मंगेश प्रकाशन, १९९०

* डॉ. जयप्रकाश मिश्र. कृषी अर्थशास्त्र

* महाराष्ट्र राज्यातील पीक उत्पादकतेतील प्रादेशिक असंतुलन कृषी अर्थशास्त्राचे मासिक.

* राधाकृष्ण पालीवाल, भारताचे आर्थिक प्रश्न आणि नियोजन.

* एस आर. वाजपेयी, सामाजिक अनुसंधान तथा सर्वेक्षण किताबघर आचार्य नगर नागपूर

* प्रा. सु.रा. बोधनकर. सामाजिक चिंतन

* प्रा. सु.रा बोधनकर समस्या

* डॉ. प्रभाकर देशमुख, आर्थिक नियोजन व विकास. पिंपळापुरे पब्लिकेशन नागपूर.

* पी. डी. सिन्हा, सामाजिक समस्या एवं समाजकल्याण